१६ वा केंद्रीय वित्त आयोग
(सन २०२६-२०३१)

**१६ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणाऱ्या अनुदान वितरणाबाबतचे सन २०२६-३१ वर्षासाठीचे निकष व संनियंत्रण याबाबत मार्गदर्शक सूचना.**

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
**शासन निर्णय क्रमांकः सोविआ-२०२६/प्र.क्र.९२/वित्त-४**
बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट,
मंत्रालय, मुंबई- ४०० ००१
**दिनांक : १५ जून, २०२६**

**संदर्भ**-१. वित्त मंत्रालय,भारत सरकार यांचे क्र.एफ.नं.६(१)/एफसीडी/२०२६-३१ दि.२१.०५.२०२६ रोजीचे पत्र.

**प्रस्तावना**

१६ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या दि.१ एप्रिल, २०२६ ते दि. ३१ मार्च, २०३१ या पाच वर्षाच्या कालावधीत ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी निधी प्राप्त होणार आहे. केंद्र शासनाने राज्यांसाठी निधी वितरीत करताना सदर निधीची परिगणना सन २०११ च्या जनगणनेनुसारची लोकसंख्या व क्षेत्रफळ या निकषांनुसार केली आहे. प्रस्तुत निधी १६ व्या केंद्रिय वित्त आयोगाने विधिवत स्थापन (Duly Constituted) झालेल्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी शिफारस केली आहे.सदर अनुदानाची विभागणी मूलभूत अनुदान (Basic Grant) आणि कार्यक्षमता अनुदान (Performance Grant) या दोन प्रकारच्या अनुदानाच्या स्वरूपात प्राप्त होणार आहे.

**मुलभूत अनुदान (Basic Grant)**

मूलभूत अनुदानाचे पुढील दोन भाग आहेत.

अ) बंधित अनुदान (Tied Grant)

ब) अबंधित अनुदान (Untied Grant)

**कार्यक्षमता अनुदान (Performance Grant)**

कार्यक्षमता अनुदानाचे दोन प्रकार आहेत.

i) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था कार्यक्षमता घटक (RLB Performance Component)

ii) राज्य कार्यक्षमता अनुदान (State Performance Component)

त्यानुसार १६ व्या वित्त आयोगांतर्गत वरील दोन प्रकारच्या अनुदानाच्या स्वरूपात प्राप्त होणारा निधी पंचायत राज संस्थाना वितरणाबाबत १६ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशी तसेच केंद्रीय वित्त मंत्रालय, भारत सरकार यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने राज्यातील पंचायतराज संस्थांसाठी वितरित करण्याबाबतचे निकष ठरविणे, वितरित निधीतून पंचायतराज संस्थानी करावयाच्या बाबी ठरविणे तसेच निधी खर्च करताना पंचायतराज संस्थांनी पालन करावयाची मार्गदर्शक तत्वे/सूचना ठरविणे याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता त्यानुसार खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय**

१. १६ व्या केंद्रीय वित्त आयोगाने नोव्हेंबर,२०२५ मध्ये केंद्र शासनास शिफारशीचा अहवाल सादर केला आहे.या आयोगाचा शिफारस कालावधी सन २०२६-२७ ते २०३०-३१ या आर्थिक वर्षासाठी आहे.ग्रामपंचायती आणि पंचायती राज संस्थांच्या सर्व स्तरासाठी १६ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.पंचायतींनी केवळ वित्त आयोगाच्या अनुदानावर अवलंबून न राहता.आता आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर/स्वावलंबी, उत्तरदायी आणि विकेंद्रीत नियोजनाला प्राधान्य देण्यात आलेले आहे.

१६ व्या केंद्रीय वित्त आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी (RLBs) मूलभूत अनुदान (Basic Grants) आणि कामगिरीवर आधारीत अनुदान (Performance Grants) अशी व्दिस्तरीय अनुदान रचना प्रस्तावित केली आहे. या व्यवस्थेमुळे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना खात्रीशीर निधीची उपलब्धता होत असताना आर्थिक शिस्त, कार्यक्षमता उत्तरदायित्वाला प्रोत्साहन मिळते.

२. **१६ व्या केंद्रीय वित्त आयोग (सन २०२६-२७ ते २०३०-३१) या कालावधीत महाराष्ट्रातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना (RLBs) उपलब्ध होणारा निधी-**

(रु.कोटींत)

| वर्ष | मूलभूत अनुदान (Basic Grants) | कार्यात्मक अनुदान (Performance Grants) | एकूण अनुदान |
|---|---|---|---|
| २०२६-२७ | ४२१६ | ० | ४२१६ |
| २०२७-२८ | ४६७९ | ६९७ | ५२५७ |
| २०२८-२९ | ५१९४ | १७५५ | ६७८३ |
| २०२९-३० | ५७६६ | १९४८ | ७५३१ |
| २०३०-३१ | ६३९९ | २१६३ | ८३५८ |
| **एकूण** | **२६२५४** | **६५६३** | **३२८१७** |

१६ वा केंद्रीय वित्त आयोग (२०२६-२७ ते २०३०-३१) या कालावधीत महाराष्ट्रातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना उपलब्ध होणारा कामगिरी अनुदान निधी (Performance Grants) चा तपशील-

(रु.कोटींत)

| वर्ष | ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था (RLBs) कामगिरी अनुदान | राज्य कामगिरी अनुदान | एकूण |
|---|---|---|---|
| २०२६-२७ | ० | ० | ० |
| २०२७-२८ | ० | ६९७ | ६९७ |
| २०२८-२९ | ९८२ | ७७३ | १७५५ |
| २०२९-३० | १०९० | ८५८ | १९४८ |
| २०३०-३१ | १२०९.५ | ९५३.५ | २१६३ |
| **एकूण** | **३२८१.५०** | **३२८१.५०** | **६५६३** |

१६ व्या वित्त आयोगाने अनुदान वितरणासाठी व्दिस्तरीय स्तर प्रणाली निश्चित केली आहे.यामध्ये मूलभूत अनुदानासाठी प्रवेश स्तर पात्रता अटी तसेच कामगिरी आधारीत अनुदानासाठी स्वतंत्र कार्य प्रदर्शन/कामगिरी अटी निर्धारीत करण्यात आल्या आहेत.याचा लाभ प्राप्त होणार असून अनुदानाचे प्रमाणही त्याच्याशी थेट निगडीत असेल.

## निधी वितरणाचे प्रमाण:-

| अ.क्र. | ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था | निधी वितरण प्रमाण |
|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद | १०% |
| २ | पंचायत समिती | १०% |
| ३ | ग्रामपंचायत | ८०% |

## निधी वितरणाचे निकष:-

| अ.क्र. | ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था | लोकसंख्या (सन २०११ च्या जनगणनेनुसार) | क्षेत्रफळ | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद | ९०% | १०% | १००% |
| २ | पंचायत समिती | ९०% | १०% | १००% |
| ३ | ग्रामपंचायत | १००% | ---- | १००% |

३. १६ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या दि.१ एप्रिल, २०२६ ते दि. ३१ मार्च, २०३१ या पाच वर्षाच्या कालावधीत ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी निधी प्राप्त होणार आहे. केंद्र शासनाने राज्यांसाठी निधी वितरीत करताना सदर निधीची परिगणना सन २०११ च्या जनगणनेनुसारची लोकसंख्या व क्षेत्रफळ या निकषांनुसार केली आहे. प्रस्तुत निधी १६ व्या केंद्रिय वित्त आयोगाने विधिवत स्थापन (Duly Constituted) झालेल्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी शिफारस केलेल्या अनुदानाची विभागणी मूलभूत अनुदान (Basic Grant) आणि कार्यक्षमता अनुदान (Performance Grant) या दोन प्रकारच्या अनुदानाच्या स्वरूपात प्राप्त होणार आहे.

**मुलभूत अनुदान (Basic Grant)**

मूलभूत अनुदानाचे पुढील दोन भाग आहेत.

अ)बंधित अनुदान (Tied Grant)

ब) अबंधित अनुदान (Untied Grant)

**अ) बंधित अनुदान (Tied Grant) –** १६ व्या केंद्रीय वित्त आयोगाने मूलभूत अनुदानाच्या ५०% रक्कम बंधित अनुदानासाठी राखून ठेवली असून त्याचा विनियोग खालील बाबींसाठी करावयाचा आहे.

i) स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन (Sanitation and Solid Waste Management)

ii) पाणी व्यवस्थापन (Water Management)

या घटकामध्ये ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या गरजानुसार खर्च करण्यासाठी लवचिकता उपलब्ध असेल यामध्ये वरील विषयांशी संबंधित ऑपरेशन व देखभाल (O&M) खर्चासाठी समावेश करता येईल.

**ब) अबंधित अनुदान (Untied Grant) –** उर्वरीत ५०% मुलभूत अनुदान हे स्थानिक स्तरावर ओळखल्या गेलेल्या गरजांची पूर्तता करण्यासाठीची शिफारस १६ व्या केंद्रीय वित्त आयोगाने केली आहे. भारतीय संविधनावरील अकराव्या अनुसूचीतील (XI Schedule) २९ विषयांतर्गत ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था हे अनुदान वापरू शकतात.

**<u>बंधित आणि अबंधित अनुदानाच्या वापरावरील मर्यादा:-</u>**

१. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांनी अबंधित (Untied) अनुदानाच्या २० टक्क्यांपेक्षा अधिक रक्कम रस्त्यांच्या बांधकाम आणि देखभालीवर खर्च करू नये. यामध्ये विविध प्रकारचे पक्के रस्ते जसे की बिटुमिनस/ब्लॅक-टॉप्ड/ॲस्फाल्ट, सिमेंट काँक्रीट, इंटरलॉकिंग काँक्रीट ब्लॉक पेव्हमेंट, खडी, मातीचे रस्ते इत्यादींचा समावेश होतो.

२. अबंधित अनुदानाचा वापर वेतन किंवा इतर आस्थापना-संबंधित खर्चासाठी करू नये. तथापि, भारताच्या नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (CAG) यांनी मान्यताप्राप्त व्यावसायिक सेवांच्या नियुक्तीवरील खर्च, जो ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाच्या लेखापरीक्षण आणि लेखांकन

कार्यांसाठी आवश्यक असेल, तो १६ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या अबंधित अनुदानातून केला जाऊ शकतो.

३. ग्रामपंचायतीने बंधित आणि अबंधित या दोन्ही अनुदानांतर्गत करण्यात येणाऱ्या विशिष्ट कामांसाठी ग्रामसभेमध्ये ठराव मंजूर करावेत. त्याचप्रमाणे, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांनाही अशाच प्रकारचे ठराव मंजूर करणे आवश्यक राहील.

४) ग्रामपंचायत/पंचायत समिती/जिल्हा परीषद यांच्या वार्षिक कृती आराखड्याचा तपशील समाविष्ट असलेला GPDP/BPDP/DPDP हा आराखडा, पंचायत राज मंत्रालय (M/o PR) आणि पिण्याचे पाणी व स्वच्छता विभाग (D/o DW&S) यांनी संयुक्तपणे निर्धारित केलेल्या समान नमुन्यात e-GramSwaraj वर अपलोड करणे.

५) १६ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या निधीच्या (बंधित आणि अबंधित) वापराबाबतचा तपशील e-GramSwaraj पोर्टलवर अपलोड करणे.

**<u>बंधित आणि अबंधित अनुदानाच्या अनुदान वितरणासाठी अटी व शर्ती:-</u>**

१. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था (पंचायती) विधिवत स्थापन झालेल्या (Duly Constituted) असाव्यात.

२. तात्पुरते आणि लेखा परीक्षित लेखे (Provisional and Audited Accounts)

**अ)** कोणत्याही आर्थिक वर्षासाठी ग्रामीण संस्थांचे मागील वर्षांचे तात्पुरते लेखे (Provisional Accounts) सार्वजनिकरीत्या उपलब्ध असावेत.

**ब)** कोणत्याही वर्षासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांचे मागील वर्षांच्या आधीच्या वर्षांचे लेखापरिक्षित लेखे (Audited Accounts) सार्वजनिकरित्या उपलब्ध असावेत या अटी आयोगाच्या पहिल्या वर्षांपासून (२०२६-२७) लागू होतील.

३. राज्य वित्त आयोगाची स्थापन राज्यांनी दर पाच वर्षांनी राज्य वित्त आयोग स्थापन करण्याच्या घटनात्मक तरतुदीचे पालन करणे आवश्यक आहे.तसेच राज्य वित्त आयोगाचा अहवाल सादर झाल्यानंतर ६ महीन्याच्या त्यावर कृषी अहवाल (Action Taken Report ATR) राज्य विधीमंडळात मांडणे अनिवार्य आहे.

४. १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या अनुषंगाने ज्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांकडे १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाचा वितरीत केलेल्या निधीपैकी १० टक्क्यांपेक्षा अधिक निधी अखर्चित राहिल्यास त्यांना आर्थिक वर्ष २०२८-२९ पासून (म्हणजे पुरस्कार कालावधीच्या तिसऱ्या वर्षापासून) १६ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या निधीचे वितरण केले जाणार नाही.

५. १६ व्या केंदीय वित्त आयोगाच्या पुरस्कार कालावधीच्या चौथ्या वर्षापासून केवळ अशाच ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान मंजूर करण्यात येईल ज्यांच्याकडे १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाचा कोणताही अखर्चित निधी शिल्लक राहिलेला नाही.

६. एखाद्या वर्षांच्या दुसऱ्या हप्त्याची मागणी करताना ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांनी मागील वर्षात वितरीत करण्यात आलेल्या बंधित आणि अबंधित अनुदानपैकी किमान ५० टक्के निधीचा विनियोग करणे आवश्यक आहे.

**कार्यक्षमता अनुदान (Performance Grant)**

कार्यक्षमता अनुदानाचे दोन प्रकार आहेत:-

**i) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था कार्यक्षमता घटक (RLB Performance Component) –**

ग्रामपंचायतीकडे कर आकारणी (Taxation) आणि वापरकर्ता शुल्क (User Charges) आकारण्याचे आवश्यक अधिकार आहेत म्हणून स्वत: चे उत्पन्न (Own Source Revenue-OSR) किमान स्तर गाठणाऱ्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच कार्यक्षमता घटकाच्या अनुदानासाठी पात्र ठरतील.

**ii) राज्य कार्यक्षमता अनुदान (State Performance Component)**

ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना पुरेसे आर्थिक संसाधन उपलब्ध करून देण्याची प्राथमिक जबाबदारी राज्याची आहे. राज्यानी स्वत:च्या संसाधानातून ग्रामीण स्थानिक स्वराज्यांकडे निधी हस्तांतरित करण्याच्या आधारावर हे अनुदान शिफारस केले आहे.

संपूर्ण कार्यक्षमता अनुदान हे अबंधित (Untied) स्वरूपाचे असेल.

**<u>कार्यक्षमता अनुदानासाठी पात्रता अटी :-</u>**

i) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था कार्यक्षमता घटक (RLB Performance Component): -

अ) ग्रामपंचायतीसाठी:- आर्थिक वर्षामध्ये पात्र होण्यासाठी, ग्रामपंचायतीने चालू आर्थिक वर्षामधील स्वत:च्या महसूल स्त्रोतापेक्षा (OSR) किमान १.०२५ पट महसूल वाढ साध्य करणे आवश्यक आहे. किंवा २०२५-२६ च्या OSR वर वार्षिक २.५% चक्रवाढ वाढ लागू

केल्यानंतरची रक्कम यापैकी जी कमी असेल ती, तसेच, किमान रक्कम प्रति कुटुंब प्रतिवर्ष रु.१२०० इतकी असावी.

आ) पंचायत समित्यांसाठी:- जर त्यांच्या कार्यक्षेत्रातील ७५% ग्रामपंचायती ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था कार्यक्षमता अनुदानासाठी पात्र ठरतील, तर पंचायत समिती ग्रामीण स्थानिक स्वराज्य कार्यक्षमता अनुदानसाठी पात्र ठरतील.

इ) जिल्हा परिषदांसाठी:-चालू आर्थिक वर्षामध्ये अनुदानासाठी पात्र होण्यासाठी, जिल्हा परिषदांनी वर्ष २०२६-२७ मध्ये,वर्ष २०२७-२८ मधील त्यांच्या OSR च्या किमान १.०२५ पट महसूल वाढ साध्य करणे आवश्यक आहे. किंवा २०२५-२६ च्या OSRवर वार्षिक २.५ % चक्रवाढ वाढ लागू केल्यानंतरची रक्कम यापैकी जी कमी असेल ती.

ii) राज्य कार्यक्षमता अनुदान (State Performance Component):-

अ) चालू वर्षामध्ये अनुदानासाठी पात्र होण्यासाठी, राज्यानी चालू वर्षा मध्ये स्व:तच्या संसाधानातून स्थानिक संस्थांना १६ व्या केंद्रिय वित्त आयोगाने त्या वर्षासाठी शिफारस केलेल्या मूलभूत अनुदानाच्या २० टक्के किंवा त्याहून अधिक रक्कम हस्तांतरित केलेली असावी.

आ) राज्याने ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना कायद्याने निश्चित करून वाटप केलेला महसूल हस्तांतरणात समाविष्ट केले जातील. जेणेकरून या अटीसाठी हस्तांतरणाची अचूक रक्कम संख्या निश्चित करता येईल.

<u>वितरित न झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्था कार्यक्षमता घटकाचा विचार:-</u>

जर कोणतीही अट पूर्ण झाली नाही, तर कार्यक्षमता अनुदानाचा वितरित न झालेला भाग पुढील पद्धतीनुसार वितरित करण्यात येईल :

(i) अट/अटी पूर्ण न झाल्यामुळे वितरित न झालेला ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना कार्यक्षमता अनुदानाचा भाग त्याच राज्यातील कार्यक्षम ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये वितरित करण्यात येईल.

(ii) एखाद्या राज्याने अट पूर्ण न केल्यामुळे वितरित न झालेला राज्य कार्यक्षमता घटकाचा भाग, राज्यस्तरीय परस्पर निकषांनुसार कार्यक्षम राज्यांमध्ये वितरित करण्यात येईल.

(iii) राज्यांमध्ये तसेच एखाद्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये वितरित न झालेल्या कार्यक्षमता अनुदान घटकाचे वितरण, वित्त मंत्रालय,भारत सरकार यांच्या दि.२१.०५.२०२६ रोजीच्या

मार्गदर्शक सूचनांनुसार परिच्छेद-३ मधील नमूद केलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था अनुदान वितरणाच्या पद्धतीनुसार करण्यात येईल.

असे नमूद करण्यात येते की, ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था/ राज्य कार्यक्षमता अनुदानाच्या वितरित न झालेल्या भागाच्या बाबतीत, प्रत्येक ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थासांठी कमाल रक्कम ही १६ व्या केंद्रीय वित्त आयोगाने त्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था/राज्यासाठी शिफारस केलेल्या वार्षिक मूलभूत अनुदानाच्या रकमेपेक्षा जास्त असणार नाही.

**४. अपवादात्मक क्षेत्रांचा विचार** (Treatment of Exempted Areas):-

सर्व क्षेत्रांच्या गरजा समान पद्धतीने पूर्ण करण्यासाठी, १६ व्या केद्रीय वित्त आयोगाने संविधानाच्या भाग IX (Part IX) च्या कार्यक्षेत्राबाहेरील क्षेत्रांनाही इतर भागांतील स्थानिक स्वराज्य संस्थांप्रमाणेच समान दर्जा दिला आहे.संबंधित राज्य सरकारे या क्षेत्रांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांबाबत १६ व्या केद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार निधी वाटप करतील.

अपवादात्मक क्षेत्रांचा विचार (Treatment of Exempted Areas) पुढे राज्याला देय असलेल्या एकूण ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था अनुदानातून संबंधित राज्य सरकारने संविधानाच्या भाग IX च्या कार्यक्षेत्राबाहेरील क्षेत्रांसाठी वर्षनिहाय/पाच वर्षांच्या पुरस्कार कालावधीसाठी निधीचे वाटप करावे. हे वाटप पुरस्कार कालावधीच्या सुरुवातीस म्हणजे २०२६-२७ मध्येच निश्चित करून त्याची माहिती व्यय विभाग, वित्त मंत्रालय आणि पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार यांना द्यावी.

त्यानुसार, या मार्गदर्शक सूचनांनुसार अनुदान वितरणासाठी लागू असलेल्या सर्व अटी (विधिवत निवडून आलेल्या स्थानिक संस्थांच्या अटी वगळता) संविधानाच्या भाग IX च्या कार्यक्षेत्राबाहेरील क्षेत्रांनाही लागू राहतील.

**५. लेखांकन आणि लेखापरीक्षण**

सर्व ग्रामीण स्थानिक स्वराज संस्थांनी (RLBs) नमुना लेखा प्रणाली (Model Accounting System - MAS) चे पालन करावे आणि ई-ग्रामस्वराज (e-GramSwaraj) प्लॅटफॉर्मद्वारे लेखे ठेवावेत. तसेच सर्व आर्थिक व्यवहार (प्राप्ती व खर्च) e-Gram Swaraj PFMS Interface मार्फतच करण्यात यावेत, हे सुनिश्चित करावे. तात्पुरत्या लेख्यांचे वार्षिक लेखापरीक्षण MoPR च्या AuditOnline अनुप्रयोगाद्वारे करण्यात येईल. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांनी Audit Online पोर्टलमध्ये विकसित केलेल्या ATR Module द्वारे कृती अहवाल (Action Taken Report ATR) सादर करण्यात यावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्र. **२०२६०६१५१४३५२४८०२०** शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

MANOJKUMAR SHRENIK SHETE

Digitally signed by MANOJKUMAR SHRENIK SHETE
DN: c=IN, postalCode=410206, st=MAHARASHTRA, street=302 KOHINOOR COMPLEX ,PLOT NUMBER 25 ,RAIGARH,SECTOR NUMBER 21 KAMOTHE ,410206, l=RAIGARH, o=Personal, serialNumber=2b8a6046860edec9b80f99e591a5fd9e1197cbf3ebadcd9c91ac6fff44440f57, pseudonym=f48e52aab0bb428e8499636dd00bb412, 2.5.4.20=fb747e637e0a121446d3119c732a784dd0fe7a1e26457765f83c306f61f287e8, email=MANOJKUMARSHRENIKSHETE@GMAIL.COM, cn=MANOJKUMAR SHRENIK SHETE
Date: 2026.06.15 16:35:19 +05'30'

**(डॉ.मनोजकुमार शेटे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत.

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४. मा.मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
५. मा.राज्यमंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
६. मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा / विधान परिषद
७. मा.विधानसभा व विधान परिषद सदस्य.
८. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
९. मा.सचिव (ग्रा.वि. व पं.रा.) यांचे स्वीय सहाय्यक
१०. महालेखापाल, महाराष्ट्र - १ (लेखापरीक्षा), मुंबई (पाच जादा प्रतीसह)
११. महालेखापाल, महाराष्ट्र - २ (लेखापरीक्षा), नागपूर (पाच जादा प्रतीसह)
१२. सर्व विभागीय आयुक्त. (महसूल)
१३. सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.
१४. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
१५. सर्व उपसचिव / अवर सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. सर्व सहमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व विभाग)
१७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
१८. जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
१९. सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
२०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२१. वित्त विभाग (व्यय-१५/अर्थसंकल्प१७- / वित्त आयोग कक्ष.)
२२. ग्राम विकास विभाग ( सर्व कार्यासने )
२३. निवड नस्ती का.वित्त-४, ग्राम विकास विभाग, मुंबई १.